## एम.ए –IV- (भारताच्या राज्याचे राजकारण)

## UNIT – IV – निवडणुकीचे राजकारण

प्रा.डॉ.विमल राठोड

**प्रादेशिक राजकीय पक्ष** – भारताच्या राजकारणातील प्रादेशिक राजकीय पक्षांचा वाढत चाललेला प्रभाव हे भारतीय पक्षपद्धतीचे एक महत्वाचे वैशिष्टे सांगितले जाते; म्हणूनच भारतीय राजकारणाचा अभ्यास करतांना त्यामधील प्रादेशिक राजकीय पक्षांच्या भूमिकेचा विचार करणे आवश्यक ठरते.

एखाद्या विशिष्ट प्रादेशिक विभागापुरते किंवा एखाद्या प्रांतापुरते मर्यादित कार्यक्षेत्र असलेला राजकीय पक्ष होय. अखिल भारतीय किंवा राष्ट्रीय स्वरूपाच्या राजकीय पक्षांहून प्रादेशिक राजकीय पक्ष त्याच्या कार्यक्षेत्राच्या बाबतीत वेगळा असतो. अखिल भारतीय किंवा राष्ट्रीय स्वरूपाच्या राजकीय पक्षाला संपूर्ण देशात कार्य करावयाचे असते. त्याच्या कार्यक्षेत्राला प्रादेशिक मर्यादा नसतात; पण प्रादेशिक पक्षाच्या कार्यक्षेत्राला अशा मर्यादा पडलेल्या असतात.

राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष यांच्यातील फरक फक्त कार्यक्षेत्रापुरताच सीमित नाही. त्यांच्या दृष्टीकोनात आणि उद्धीष्टातही महत्वाचा फरक असतो. राष्ट्रीय पक्षाचा दृष्टीकोन व्यापक स्वरूपाचा असतो. तो प्रामुख्याने राष्ट्रीय हितसंबधाना प्राध्यान देतो. तसेच समाजातील वेगवेगळ्या हितासंबंधाचे प्रतिनिधित्व करतो. प्रादेशिक राजकीय पक्षाचा दृष्टीकोन मात्र संकुचित स्वरूपाचा असतो. तो शक्यतो प्रादेशिक हितसंबधाना प्राध्यान देतो आणि समजातील विशिष्ट प्रकारच्या हितसंबधाचेच तो प्रतिनिधित्व करतो. मात्र सर्वच प्रादेशिक पक्षांचा दृष्टीकोन संकुचित स्वरूपाचा असे म्हणने बरोबर होणार नाही. काही राजकीय पक्ष प्रादेशिक स्वरूपाचे असले तरी त्यांनी नेहमी राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले असल्याचे पहावयास मिळते.

भारतातील प्रादेशिक पक्षांची उभारणी निरनिराळ्या तत्वांवर झाली आहे. काही प्रादेशिक पक्ष धर्माच्या व जातीच्या आधारावर स्थापन झाले आहेत. अकाली दल, मुस्लीम लीग, राष्ट्रीय लोकदल इत्यादी राजकीय पक्ष त्यांची उदाहरणे होत. काही प्रादेशिक पक्षाची उभारणी भाषेच्या आधारावर झाली आहे. तेलगु देसम व द्रविड मून्नेत्र कळघम ही याची उदाहरणे देता येतील. पक्षाच्या संघटनेत एखाद्या प्रांतापूरती फुट पडल्यानेही प्रादेशिक पक्षांचा उदय झाला आहे. केरळ कॉंग्रेस, अरुणाचल कॉंग्रेस, तूणमूल कॉंग्रेस आणि शरद पवार यांनी स्थापन केलेली राष्ट्रवादी कॉंग्रेस ही याची उदाहरणे आहेत. तथापी, प्रादेशिक राजकीय पक्षाच्या उदयाचे सर्वात महत्वाचे कारण, जनतेच्या प्रादेशिक अस्मितेला घातलेले खतपाणी अबी विशिष्ट प्रदेशातील लोकांमध्ये आपल्यावर अन्याय होत असल्यासंबधी तयार झालेली भावना हेच आहे. तेलगु देशम, शिवसेना, हरियाणा विकास पार्टी, झारखंडमुक्ती मोर्चा, मणिपूर पीपल्स पार्टी यासारख्या पक्षांचा उदय याच भावनेतून झाला आहे.

प्रादेशिक राजकीय पक्षांचे अस्तित्व राष्ट्रीय हिताला बाधकच ठरते, असे म्हणता येणार नाही. प्रादेशिक राजकीय पक्ष भारतीय राजकारणाची वास्तविकता व काही प्रमाणात गरजही बनली आहे. आपल्या देशात अनेक बाबतीत विविधता असल्याने निरनिराळ्या प्रादेशिक विभागातील जनतेच्या इच्छा-आकांशाची पूर्ती करण्यात राष्ट्रीय पक्ष काही वेळा कमी पडतात. त्यातून निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे कार्य प्रादेशिक पक्ष करतात. काही प्रादेशिक पक्षांनी स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देतांना स्थानिक राजकारणाची राष्ट्रीय राजकारणाशी नळ जोडण्याचाही प्रयत्न केला आहे. थोडक्यात आपल्या देशातील विविधतेची जपणूक करतांना त्या विविधतेतून एकता साधण्याचे कार्य प्रादेशिक राजकीय पक्षांनी केले आहे.

## राजकीय श्रेष्ठीजन

समाजव्यवस्थेत सर्व क्षेत्रांत विशिष्ट लोकच निर्णय प्रकियेत वर्चस्व प्रस्थापित करीत असतात. त्याचप्रमाणे राजकीय व्यवस्थेत देखील काही थोडे लोक अशा पद्धतीचे वर्चस्व प्रस्थापित करतात. त्या लोकांच्या गटाला ‘राजकीय श्रेष्ठीजन’ असे म्हणतात. प्रत्येक शासनप्रकारात अशा पद्धतीची व्यवस्था दिसून येते. हे श्रेष्ठीजन राजकारणात महत्वाची भूमिका पार पाडीत असतात. या गटातील व्यक्ती महत्वाची पदे भूषवितात. प्रत्येक शासन व्यवस्थेत यांचे अस्तित्व आढळून येते. समाजव्यवस्थेत देखील वर्ग-जातीच्या आधारे श्रेष्ठीजनांचा गट आपले वर्चस्व प्रस्थापित करतो. या गटाचे राजकीय निर्णय प्रक्रियेवर वर्चस्व असते. श्रेष्ठीजनांची निर्मिती आनुवंशिकतेतून, अर्जित घटकांतून, निवडणुकीच्या माध्यामतून तसेच आपल्या कर्तबगारीने व विशिष्ट तत्त्वप्रणालीचा अंगीकार, अशा विविध अवस्थांमधून राजकीय व्यवस्थेत श्रेष्ठीजन पदापर्यंत व्यक्ती पोहोचतो.

समाजात एक असा अल्पसंख्य गट असतो. त्यांच्या हाती बुद्धी, संपत्ती, शिक्षण व प्रभाव एकवटलेला असतो. अल्पसंख्याक मुठभर लोकांची सामाजिक मिरासदारी प्रस्थापित होते. लोकशाहीत श्रेष्ठी जनांच्या हातात सत्ता एकवटने हे खरे असले तरी सत्तेच्या संगोपन व संरक्षणाची जबाबदारी श्रेष्टीजनाकडे असते. पेरीच्या मते, श्रेष्ठीजनवादाचा मुख्य गाभा म्हणजे प्रत्येक समाजात अल्पसंख्य गट समाज हिताचे महत्वपूर्ण निर्णय घेता या निर्णयाची व्याप्ती मोठी असते.त्याचा परिणाम अनेक लोकांवर होतो. याचा अर्थ राजकीय निर्णय कायदेमंडळ व शासकीय अधिकाऱ्याकडून घेतला जात नाही तर अल्पसंख्य गटाकडून घेतला जातो. त्यास मोस्काने राजकीय वर्ग असे म्हटले आहे. या वर्गाला निवडणुकामुळे नव्हे इतर मार्गांनी वर्चस्व मिळालेले आहे. मतदाराकडे जर कोणती सत्ता असेल तर ती निर्णय घेण्याची सत्ता नसून निर्णय कोणी घ्यावेत ही ठरविण्याची सत्ता असते असे श्रेष्टीजनवादी म्हणतात.

## मानवी विकासाचे मुद्दे

प्रादेशिक असंतुलन – राज्याच्या वेगवेगळ्या वेगवेगळ्या विभागात विकासाच्या बाबतीत जी तफावत निर्माण झाली आहे तिला ‘असंतुलित प्रादेशिक विकास’ किंवा ‘विकासातील प्रादेशिक असमतोल’

असे म्हटले जाते. हे संतुलन दूर करावे व समतोल प्रादेशिक विकास साधण्याचा प्रयत्न करावा,अशी मागणी या प्रश्नाच्या संदर्भात केली जाते. समतोल प्रादेशिक विकास म्हणजे राज्याच्या मागासलेल्या विभागाच्या विकासामध्ये जो अनुशेष राहिला आहे, तो अनुशेष भरून काढणे आणि अशा प्रकारे त्या विभागांना राज्याच्या प्रगत विभागांच्या बरोबरीला आणण्याचा प्रयत्न करणे होय.

कोणत्याही राज्यातील जनतेच्या मनात समानतेची आणि एकात्मतेची भावना निर्माण होण्यासाठी समतोल प्रादेशिक विकास घडवून आणणे आवश्यक असते. राज्यातील काही विभाग कायमचे किंवा दीर्घ काळ मागासलेल्या अवस्थेत राहिले तर त्या विभागातील जनतेच्या मानत आपणावर अन्याय होत असल्याची भावना निर्माण होते. काही वेळा ही भावना चुकीच्या गृहीत तत्वावर आधारलेली असू शकते. तथापी, कोणत्याही कारणाने का असेना, पण राज्यातील काही भागांमध्ये अशा प्रकारची भावना वाढीस लागणे हे त्या राज्याची एकसंघता टिकून राहण्याच्या दृष्टीने निश्चितच धोकादायक असते. म्हणूनच, महाराष्ट्र राज्य एकसंघ राहण्यासाठी महाराष्ट्राच्या सर्व प्रादेशिक विभागाचा समतोल विकास झाला पाहिजे, असे मत व्यक्त केले जाते.

साक्षरता – मानवी विकासासाठी साक्षरता हा घटक महत्वपूर्ण ठरतो आहे. सामान्यत: राज्यात शिक्षण व्यवस्था असावी की, ज्याद्वारे राष्ट्राभिमान, राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेम योग्य प्रकारे जोपासले जाईल. राष्ट्रीयत्वाची भावना, एकात्मता वाढीला लागेल अशा पद्धतीचा अभ्यासक्रम तयार करणे, तरूण पिढीच्या मनात राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान, राष्ट्रसेवा या भावना निर्माण करणारे शिक्षण प्रादेशिक भाषेतून देणे, शासकीय प्रचारमाध्यमांद्वारे राष्ट्रीय शिक्षण देणे, भारतीय संस्कृती, भारतीय घटना, भारतीय इतिहास, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय अस्मिता जोपासणारे शिक्षण देणे, धर्माधता, जातीयता, प्रादेशिकता यांना शिक्षणात स्थान न देणे अशा प्रकारे शिक्षणविषयक काळजी घेतली तर राष्ट्रीय एकात्मतेला पोषक व अनुकूल असे वातावरण निर्माण होईल. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारख्या महापुरुषानी शिक्षण सर्वासाठी खुले व्हावे व सर्वांना शिक्षण घेता यावे यासाठी पराकाष्टा केली आहे.

दारिद्र निर्मुलन – एखाद्याजवळ काय आहे आणि काय असावयास पाहिजे यामध्ये तफावत दर्शवणारी स्थिती म्हणजे दारिद्रय होय. दारिद्रय ही सापेक्ष व तुलनात्मक स्वरुपाची कल्पना आहे. बंगल्याच्या मालकापेक्षा आपण दरिद्री आहोत असे झोपडपट्टीवासियांना वाटते. बेघर असल्यामुळे रस्ते व फुटपाथवर झोपणाऱ्याना आपम झोपडपट्टीवाल्यापेक्षाही गरीब आहोत असे वाटते.दारिद्रय हा अर्थशास्त्र तसेच समाजशास्त्राच्या अध्ययनाचा विषय आहे. जिवंत राहण्यासाठी व्यक्तीला उर्जेची गरज असते. उर्जा ही अन्नसेवनातून निर्माण होते. शारीरिक हालचाली करण्यासाठी २४०० उष्मांकांची (कॅलरीची ) गरज आहे. दररोज २४०० कॅलरी ग्रहण करण्याची व्यक्तीची स्थिती नसेल तर ती व्यक्ती गरीब किंवा दरिद्री आहे असे म्हणता येते.

सामाजिक अथवा आर्थिक समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून दारिद्र्याची व्याख्या करतांना वंचितता, समानता आणि तुलनात्मकता या तीन घटकांवर भर दिला जातो.

दारिद्राची कारणे – अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता,सरंजामी मनोवृत्ती, काळापैसा, भ्रष्ट्राचार, उद्योजगतेचा अभाव, दारिद्रयजन्य संस्कृती यासारखी विविध कारणे दारिद्र्याच्या संदर्भात नमूद केली जातात.

दारिद्र निर्मूलनाचा कार्यक्रम – दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम तयार करणे हे सत्तारूढ पक्षाच्या सरकारचे कार्य होय. सत्तारूढ पक्षाचे सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरीही विरोधी पक्षांना तो कार्यक्रम अयोग्य आहे असे वाटत असते, कारण आपल्या पक्षाची विचारप्रणाली, कार्यक्रम, ध्येयधोरणे हेच जनकल्याणाच्या दृष्टीने योग्य आहे अशी प्रत्येक पक्षाची भावना असते. दारिद्रय निर्मुलन योजनेला निश्चित नाव दिले जाते. जसे अंत्योदयकार्यक्रम. रोजगार हमी योजना, इंदिरा आवास योजना, डॉ.आंबेडकर ग्राम योजना इत्यादी.

बेरोजगार – जेव्हा एखादी धडधाकड व्यक्ती आपल्या व कुटुंबांच्या चरितार्थ निर्वाध्ये साधन म्हणून अर्थार्जन करू शकत नाही त्या व्यक्तीस बेरोजगार म्हणतात.

बेरोजगार निर्माण होण्यामागील कारणे – १.लोकसंख्या वृद्धी २.विकासाची मंदगती ३.मागासलेला शेती व्यवसाय ४.ग्रामीण उद्योगाचा ऱ्हास ५.मजुरांचा वाढता पुरवठा ६.सदोष शिक्षण प्रणाली ७. तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण प्रणालीचा अभाव ८.आर्थिक मंदी ९.आळस इत्यादी बेरोजगारीची कारणे सांगता येतात.

बेरोजगारीचे दुष्परिणाम – १.प्राथमिक गरजांवर परिणाम २. मानसिक दडपण ३.सामाजिक नैतिक मुल्यांचा ऱ्हास ४.कौटुंबीक विघटन ५.वेश्याव्यवसाय ६.कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम ७. समाजावर दुष्परिणाम

बेरोजगारीवर उपाय – १.लोकसंख्येला आळा घालणे २.कृषी क्षेत्राचा विकास ३.कुटीर व लघु उद्योगांचा विकास ४. रोजगारभिमुख शिक्षण प्रणाली ५. माहिती व व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र ६.राष्ट्रीय धोरण ७.उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण ८.हंगामी बेरोजगारी संबंधी धोरण ९. स्वयंरोजगारासाठी अधिक मदत इत्यादी उपाय योजना द्वारे बेरोजगारी कमी होण्यास मदत होत असते.

---

संदर्भ –

१. भारतीय शासन आणि राजकारण – बी.बी.पाटील – फडके प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९९.

२.भारतीय शासन आणि राजकारण – रा.ज.लोटे – पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर, प्रथम आवृत्ती जून २००३